महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

महाराष्ट्रातील जिल्हा, तालुका तसेच गाव पातळीवर प्रतिनिधी होण्याची सुवर्णसंधी!
पत्रकारीता करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी संपर्क साधावा.
※ संपादक ※
मो. क्र. ९५४५९ १०१७७ व ९२७२४ ५३९२१

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - ११ वे ■ अंक क्र. -१५१ ■ शनिवार दि. २८ डिसेंबर २०२४ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

## २ लाखांची लाच स्वीकारतांना सरपंच, लिपिकसह खाजगी इसमास पकडे



दै. आवाज वृत्तसेवा...
यशवंतराव ताडगे पळाशी / प्रतिनिधी :- बहाळ तालुका चाळीसगाव येथील ग्रामपंचायत सरपंच व लिपिक व खाजगी साथीदार (पंटर) यांना दोन लाख रुपयांची लाच स्विकारताना धुळे येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पकडले असता यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिघा जणांना अटक करण्यात असता सरपंचासह लिपिक व खाजगी साथीदार यांना जळगांव येथील सत्र न्यायालयात हजर केले असता २८डिसेंबर पर्यंत (एसीबी) पोलिस कस्टडी सुनावली तर खाजगी साथीदार यास न्यायलयीन कोठडीत रवानगी करण्यात आली. सविस्तर माहिती अशी की बहाळ येथील तक्रारदार ७५वर्षीय वयोवृद्ध शेतकरी यांची बहाळ (रथाचे) ता. चाळीसगाव जि. जळगाव येथे मालकी कब्जे वहीवाटातील शेत जमीन असून या जमिनीवर बहाळ (रथाचे) ग्रामपंचायत हे त्यांचा हक्क दाखवून सदरची जागा परस्पर इतर व्यक्ती भाडेतत्त्वावर देऊ शकत असल्याने तक्रारदार यांनी ग्रामपंचायती विरुद्ध न्यायालयात कायमस्वरूपी मनाई हुकूम आणला होता. बहाळचे सरपंच राजेंद्र महादू मोरे यांनी तक्रारदार यांना भेटून त्यांच्या जमिनीबाबत ग्रामपंचायतकडून कोर्टकचेरी पासून त्रास होऊ देणार नाही. या मोबदल्यात दीड हजार चौरस फुटाचा प्लॉट खरेदी करून घ्यावा लागेल असे सांगितले.नाही दिला तर कोर्ट कचेरीचा त्रास होईल .तडजोडीत प्लॉट ऐवजी दुसरे काही देऊ असे सांगितले तडजोडी नंतर दहा लाख रुपयांची मागणीवरून पाच (पान ४ वर)

## कारवर पेट्रोल टाकून सरपंचाला जिवंत जाळण्याचा प्रयत्न



दै. आवाज वृत्तसेवा...
किरण घायदार, नाशिक/धाराशिव -: बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर राज्यात कायदा सुव्यवस्थेबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत. अशातच बीडच्या प्रकरणाची पुनरावृत्ती वाटावी अशी घटना धाराशिवमधील तुळजापूर तालुक्यात घडली आहे. तुळजापूर तालुक्यातील मेसाई जवळगा गावच्या सरपंचावर जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मेसाई जवळगा गावच्या सरपंचाच्या गाडीवर पेट्रोल टाकून त्यांना जिवंत जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या घटनेने धाराशिव जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. मेसाई जवळगा गावचे सरपंच नामदेव निकम मध्यरात्री गाडीने प्रवास करत होते. गाडीत त्यांचा भाऊ देखील होता. तेव्हा अचानक त्यांच्या गाडीवर हल्ला झाला. दगडांनी काचा फोडून, गाडीत पेट्रोल टाकून गाडी पेटवण्याचा प्रयत्न केला गेला. या हल्ल्यामध्ये नामदेव निकम थोडक्यात बचावले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, नामदेव निकम बारुळ गावातून मेसाई जवळगा गावच्या दिशेने जात होते. त्यांच्या गाडीच्या दोन्ही बाजूंनी दोन बाईक आल्या. बाईकवरचे लोक हॉर्न वाजवत होते. त्यांना पुढे जायचे आहे असं समजून नामदेव यांनी गाडीचा वेग कमी केला. लगेच त्या बाईकस्वारांनी डाव्या दरवाजाची काच दगडाने फोडली आणि पेट्रोलचे फुगे गाडीत टाकले. आम्ही गाडीचा वेग वाढवला. तेव्हा बाईकवरच्या गुंडांनी आमच्या गाडीच्या समोरच्या काचेवर अंडी फेकली. अंड्यांमुळे काच खराब झाल्याने आम्हाला गाडीचा वेग कमी करावा लागला. त्यानंतर बाईक जवळ आणत गुंडांनी गाडी पेटवण्याचा प्रयत्न केला', असा घटनाक्रम नामदेव निकम यांनी सांगितला.

## नांदगाव - पांझण लोहमार्गावर आढळला अज्ञात व्यक्तीचा मृतदेह

### संपर्कासाठी पोलीस निरीक्षक प्रितम चौधरी यांचे आवाहन

दै. आवाज वृत्तसेवा...
नांदगाव/प्रतिनिधी-: २६ /१२/ २०१४ रोजी लोहमार्गावरील पोल क्रमांक २८३/ ६ व पोल क्रमांक २८३ /८ दरम्यान नांदगाव रेल्वे स्टेशन ते पांझण रेल्वे स्टेशन दरम्यान एक अज्ञात मृत व्यक्ती रेल्वे कर्मचाऱ्यांना आढळून आली यासंदर्भातली खबर नांदगाव पोलिसांना देऊन त्याची आकस्मित नोंद करण्यात आली. सदर व्यक्ती गंभीर जखमी होऊन मृत झालेला आहे या व्यक्तीचा गाडीतून एक्सप्रेस मधून पडून मृत्यू झाला सदर अज्ञात मृत व्यक्तीचे वय सुमारे ३० ते ३५ असून वर्ष त्याची उंची पाच ते साडेपाच फुट आहे. अशा वर्णनाचा मृत व्यक्ती लोहमार्गावर आढळून आला सदर व्यक्तीचा मृत्यू गाडीतून पडून झाला की अन्य कारणाने झाला याचा पोलीस शोध घेत आहे. मृताच्या अंगावर पोपटी कलरचा टि शर्ट, आणि काळा कलरची पॅन्ट, टी-शर्ट मेंहदी कलर, असे वर्णन आहे. सदर व्यक्ती प्रवास करताना मृत्यू झाला असावी. असा अंदाज केला. या घटनेचा नांदगाव पोलीस शोध घेत असून घटनेची अकस्मित मृत्यू नोंद झालेली आहे. अज्ञात मृत व्यक्तीच्या व्यक्तींनी वर्णनावरून त्याचा अंदाज बांधून पोलिसांशी संपर्क करावा असे आवाहन नांदगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रीतम चौधरी यांनी केले आहे.

## कळवण तालुक्यासह गाव खेड्यात गुटखा जोमात

दै. आवाज वृत्तसेवा...
गणेश पवार आमदर (कळवण) / प्रतिनिधी-: कळवण दि २० तालुक्यात तंबाखू, गुटखा विक्री बंदीचा कायदा नावालाच दिसून येत आहे. शहरांसोबत गावागावांत खुलेआम पानटपऱ्यांसह किराणा दुकानात तंबाखू व गुटख्याची विक्री होत आहे. एवढेच नव्हे तर शाळा परिसरालगत ही दुकाने खुलेआम सुरू आहेत. त्यामुळे प्रशासन धडक मोहीम राबविणार काय, असा प्रश्न आहे.

राज्यात २० जुलै २०१२ रोजी गुटखा बंदीचा निर्णय झाला. त्याला बारा वर्षे पूर्ण झाली पण ना त्याची कडक अंमलबजावणी झाली, ना गुटखा विक्री थांबली. कळवण शहर किंवा ग्रामीण भागा मधील पानटपरी, चहाचे स्टाल व किराणासह ईतर दुकानांमध्ये गुटख्याची विक्री होत आहे. गुटखा विक्री होत असतानाही कारवाई होताना दिसत नाही. आंतरराज्यीय सीमांवर पोलिसांचे तपासणी नाके असतानाही गुटखा येतोच कसा, या प्रश्नाचे ठाम उत्तर अधिकारी देऊ शकत नाहीत.

शहरामध्ये इतर राज्यांतून मोठ्या प्रमाणावर गुटखा विक्रीला येतो. गुटखा बंदीनंतर अनेकांनी मावा विक्रीचा नवा व्यवसाय सुरू केला. त्यातूनच गुटख्याची विक्री सुरुवातीला चोरून केली जात होती. आता सर्रासपणे केली जात आहे. तरुणांना व्यसनाधीनतेपासून दूर ठेवून निरोगी, सदृढ समाजाच्या निर्मितीसाठी हातभट्टी दारू, गुटखा, मावा विक्रीवर कडक निर्बंध लावण्यात आले; पण शासकीय यंत्रणांच्या दुर्लक्षामुळे कायद्याचे पालन होत नाही. होणार आहे.

कारवाईची धडक मोहीम हाती घेणे गरजेचे आहे. शरीरावर परिणाम, मात्र नाद सुटता सुटेना तंबाखू, गुटख्याचे परिणाम अनेकांच्या आरोग्यावर झाले आहेत. गुटखा खाणाऱ्यांचे तोंड उघडत नाही. अनेकांना व्यवस्थित जेवणही करता येत नाही. आरोग्यावर विपरित परिणाम होत आहेत. तरुणांच्या आरोग्यावर तंबाखू, गुटख्याचे सर्वाधिक वाईट परिणाम दिसत असल्याचे कर्करोगतज्ज्ञ सांगतात. तरीपण, गुटखा, मावा खाणाऱ्यांना त्याचा नाद सुटता सुटत नसल्याचे दिसून येत आहे. अवैध साखळी तोडण्याची गरज - तालुक्यासह जिल्ह्यात गुजरात राज्यांतून सापुतारा मार्गे तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांची आयात होते. अन्न व औषध प्रशासन, तसेच पोलिस विभागाकडून कित्येकदा कारवाई केल्या जातात. मात्र, त्यानंतरही त्यांची आवक व विक्री बंद होताना दिसत नाही. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांची आयात व विक्री यांची मोठी साखळी असून, ती तोडण्यासाठी कठोर कारवाई होण्याची गरज आहे.

## शिवसेना मित्र मंडळ ठाणे पुर्व सामाजिक संस्थेच्यावतीने व्यंगचित्र स्पर्धेचे आयोजन !

दै. आवाज वृत्तसेवा...
गुरुनाथ तिरपणकर, ठाणे/प्रतिनिधी- स्वर्गीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे स्मृती व्यंगचित्रकला स्पर्धा २०२५ साठी व्यंगचित्रांच्या माध्यमातून समाज प्रबोधन या विषयावरील व्यंगचित्र पाठवण्याचे आवाहन शिवसेवा मित्र मंडळ, ठाणे पूर्व या सामाजिक संस्थेच्या वतीने स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती प्रित्यर्थ व्यंगचित्रकला स्पर्धा आयोजित केली आहे. स्पर्धेचं हे १२ वे वर्ष असून, या व्यंगचित्रकला स्पर्धेसाठी १) बालव्यंगचित्रकार (वय वर्ष १५ खालील) २) दिव्यांग स्पर्धकांसाठी विशेष गट ३) हौशी व्यंगचित्रकार - खुला गट (वय वर्ष १६ वरील) ४) स्पर्धेतील उत्कृष्ट सहभागासाठी पहिल्या तीन शाळांसाठी विशेष सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येईल. सर्व स्पर्धकांनी व्यंगचित्रांच्या माध्यमातून समाज प्रबोधन या विषयावरील आपली व्यंगचित्र, अे ३ साइझ (४२ द ३० सेंमी) पेपर मध्ये, तसेच व्यंगचित्राच्या मागे आपले संपूर्ण नाव, पत्ता, जन्म तारीख/वय, स्पर्धक गट, मोबाईल नंबर, त्याचप्रमाणे बालव्यंग चित्रकारांनी आपल्या शाळेचं नाव, ईयत्ता लिहून, धर्मवीर आनंद दिघे चौक , मंगला हिंदी शाळेसमोर, कोपरी, ठाणे पूर्व ४००६०३ येथे दिनांक १६ जानेवारी २०२५ ते दि. २० जानेवारी २०२५ च्या दरम्यान सायंकाळी ७ ते ९ या वेळेत पोहचतील अशी व्यवस्था करावयाची आहे.



परीक्षकांनी निवडलेल्या निवडक व्यंगचित्रांचे प्रदर्शन गुरुवार दि. २३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० ते रात्री १० पर्यंत आयोजित केले जाणार आहे आणि गुरुवार दि. २३ जानेवारी २०२५ रोजी या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मान्यवरांच्या शुभहस्ते सायंकाळी ७ वाजता ठाणे महापालिका, खुले कलादालन, अष्टविनायक चौक, मिठ बंदर रोड, ठाणे पूर्व येथे आयोजित करण्यात येईल.

१) परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल. २) व्यंगचित्राच्या पुढील भागात स्पर्धकाचे नाव लिहिलेली व्यंगचित्र स्पर्धेसाठी पात्र नसतील ३) राजकीय नेत्यांची किंवा राजकीय किंवा जातीय सलोखा बिघडवणाऱ्या विषयांवरील व्यंगचित्र स्पर्धेसाठी आणि प्रदर्शनासाठी पात्र नसतील ४) एकदा पाठवलेली व्यंगचित्र ही पुन्हा परत मिळणार नाहीत ५) स्पर्धकांची व्यंगचित्र त्यांनी स्वखर्चाने आणि स्वतःच्या जबाबदारीवर पाठवलेल्या स्पीड पोस्ट अथवा कुरियर मार्फतही दिनांक २० जानेवारी २०२५ पर्यंतच स्वीकारली जातील, त्यासाठी ९८३३१५८८०० या भ्रमणध्वनी वर संपर्क साधावा. ६) ऋही व्यंगचित्रकला स्पर्धा सर्व नागरिकांसाठी खुली आहे. ७) ऋस्पर्धेच्या नियमांत आयत्यावेळी बदल करण्याचे सर्व अधिकार हे शिवसेवा मित्र मंडळ. ठाणे पूर्व कडे राखीव असतील. अधिक माहितीसाठी संपर्क ९२२४१९९९७९ /९७६८६८८२९७ /९८६९४१३९११ /९८३३१५८८००

# जे एम एफ शिक्षण संस्थेमध्ये सांताक्लॉजच्या सहवासात नाताळ साजरा



**दै. आवाज वृत्तसेवा...**

डोंबिवली (प्रतिनिधी) – सर्व मुलांचा आवडता आणि आनंद देणारा सण म्हणजे नाताळ.शाळेला दहा दिवसांची सुट्टी आणि त्यातच कल्पना विश्वात रममाण होऊन सांताक्लॉज भेटीला येऊन काहीतरी भेटवस्तू मिळणार हे निरागस मन.

जे एम एफ संस्था अंतर्गत जन गण मन इंग्लिश सेकंडरी शाळा आणि विद्यामंदिर शाळेने जल्लोषात नाताळ सण साजरा केला.सर्व मुली लाल रंगाचे पोशाख परिधान करून आले होते. जणू काही ब्रह्मा रंगतालयात लाल पऱ्या अवतरल्या आहेत असे वाटत होते.तर सर्व मुले सांताक्लॉज च्या वेषात आले होते. जिंगल बेल्स च्या संगीतावर सर्वच जण थिरकत होते.

जे एम एफ संस्थेचे संस्थापक माननीय डॉ राजकुमार कोल्हे आणि सचिव डॉ प्रेरणा कोल्हे तसेच इतर पदाधिकारी यांनी येशू ख्रिस्ताच्या प्रतिमे पुढे मेणबत्ती प्रज्वलित करून अभिवादन केले, त्याच बरोबर सर्व विद्यार्थ्यांनी येशू ख्रिस्ताचे प्रार्थना गायन केले.

सर्व मुलांनी नाताळच्या विविध वस्तू स्वतः हाताने बनवून आणून शाळा सजवली होती. हस्तकला शिक्षिका सपना येंनम व दीपा तांबे यांनी सुबकपणे ख्रिसमस ट्री, स्नो मॅन,अशा बऱ्याच हस्तकला वस्तू मुलांना शिकवून त्यांच्या कडून तयार करून घेतल्या.

लोकांनी केलेली अवहेलना सहन करून देखील , जगाला शांततेचा मार्ग दाखविणारा एक अमर आत्मा म्हणजे येशू ख्रिस्त.स्वतःच्या हृदयात शांतता आणि दयेची ज्योत तेवत ठेऊन जगाला जो उपदेश येशू ख्रिस्ताने केला आहे अशा सामर्थ्याला जगी तोड नाही ,असे उदगार संस्थापक डॉ राजकुमार कोल्हे यांनी काढले.तर सर्वांगाला खिळे ठोकत असतानाही 'हे ईश्वरा या लोकांना माफ कर' असे म्हणणारा साक्षात येशू म्हणजे ईश्वराचा च अंश आहे आणि त्यांनी केलेल्या उपदेशाचे आपण पालन करणे म्हणजेच येशूच्या जन्म दिवसाची येशूला दिलेली सर्वोत्तम भेट आहे, असे सचिव डॉ प्रेरणा कोल्हे यांनी सांगितले.

सकाळी नऊ ते अकराच्या वेळेमध्ये अनेक सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले. त्यामधे अनेक उत्साही पालकांनी नृत्य , गिटार वादन सादर केले. सर्व पालकांना संस्थापक व सचिव यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व चषक देण्यात आले.

सांताक्लॉज चे आगमन होताच सर्व मुलांनी एकच जल्लोष केला व भेटण्यासाठी सर्व मुलांनी सांताक्लॉज भोवती गराडा घातला ,तर सांताक्लॉज ने देखील सर्वांना आलिंगन देऊन चॉकलेट, केक, बिस्कीट, आणि अनेक भेटवस्तू त्याच्या पोटलीतून काढून वाटल्या.

केक कापून सर्वांनी नाताळ सण साजरा केला, व जल्लोषात बेभान होऊन नाचू लागले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता पाचवी मध संयुक्ता व आयुशी या विद्यार्थिनींनी केले तर आभार प्रदर्शन आरोही हिंगमिरे ने केले व आनंदाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# वैजनाथ जिजाजी विद्यालयात वीर बाल दिवस साजरा



**दै. आवाज वृत्तसेवा...**

मनमाड – वैजनाथ जिजाजी विद्यालयात गुरुवार २६ डिसेबर २०२४ रोजी =चवीर बाल दिवस अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

प्रथमतःहा व्यासपीठावरील मान्यवरांनी बाबा गुरुगोविंदसिंग व त्यांचे चार साहिबजादे यांच्या प्रतिमेचे व माता सरस्वतीचे पुजन केले,

त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते गुरुजीतसिंगजी (ग्रंथ साहिब प्रमुख-गुपतसर गुरुद्वारा, मनमाड) यांनी शीख म्हणजे शिष्य व शिखांच्या दहा गुरूंची माहिती दिली, बाबा गुरुगोविंद-सिंगजी व त्यांच्या चार पुत्र ( साहिबजादे) यांनी धर्मरक्षणासाठी कशाप्रकारे बलिदान केले व त्यासाठी काय काय यातना भोगल्या याचे कथन मनोगतातून केले. त्यानंतर अन्य वक्ते मा.श्री.चरणप्रीतसिंगजी (शिक्षण विभाग, गुपतसर गुरुद्वारा, मनमाड) यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की आपण आपल्या संस्कृती व धर्माचे रक्षण केले पाहिजे व आपल्या अभ्यासक्रमातुन हेच शिकविले पाहिजे

तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक लक्ष्मीकांत ठाकरे यांनी बाबा गुरु गोविंद सिंग व त्यांच्या चार साहिबजादे यांनी स्वीकारलेल्या होतात्म्याची गाथा अतिशय अभ्यासपूर्ण रीतीने सांगितली, ही घटना कधी घडली, त्यावेळी चारही साहिबजादे यांचे वय किती होते, धर्मरक्षणासाठी धर्मवीर संभाजी महाराज यांनी देखील बलिदान केले याचाही दाखला दिला व आपणही आपल्या धर्माचा व राष्ट्राचा अभिमान बाळगला पाहिजे असे सांगितले

त्यानंतर शिक्षक प्रतिनिधी सुरेश नवसारे यांनी सत्कार सूत्रसंचालन व आभार मानले त्यानंतर लक्ष्मीकांत ठाकरे यांच्या हस्ते गुरुजीत सिंगजी, चरण जितसिंगजी व हरभजनसिंगजी यांचा शाल व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कुणाल जोशी यांनी केले

सरतेशेवटी सर्वांचे सुरेश नवसारे यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली

# कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने सेंद्रिय निविष्ठा निर्मिती प्रात्यक्षिक




**दै. आवाज वृत्तसेवा...**

कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजने अंतर्गत सहभागी झालेल्या श्री चक्रधर स्वामी शेतकरी गट बेजगांव व ओम साई कृषि विकास शेतकरी विकास गट नागापूर या गटातील सदस्यांचे दुस-या वर्षातील गावपातळीव-रील सेंद्रिय निविष्ठा निर्मिती प्रात्यक्षिक प्रशिक्षणाचे आयोजन हे मौजे बेजगांव येथील संतोष सानप यांच्या शेतावर करण्यात आले . सदर कार्यक्रमाप्रसंगी कु. चैत्राली ढोकणे कृषि सेवक नागापुर यांनी सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून मानवी जीवनशैलीसाठी विषमुक्त अन्नाचे महत्त्व सांगून कार्यक्रमाची प्रस्तावना केली. त्यानंतर एस.टी.कर्नर सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक नांदगाव यांनी दहा ड्रम अंतर्गत जमिनीवर देण्यात येणा-या सेंद्रिय निविष्ठा निर्मिती करणे त्यामध्ये अन्नद्रव्य व्यवस्थापन साठी वेस्ट डिकंपोझर, ह्युमिक अँसिड, फुल्विक अँसिड, सप्त धान्य स्लरी,जीवामृत स्लरी इ.निविष्ठांचे कृतीतून प्रात्यक्षिक करून दाखविले व त्याबाबतचे पिकांना होणारे फायदे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.तसेच फवारणी साठीचे ड्रम त्यामध्ये ईएम १ सोल्युशन, ईएम देशीकल्प, ईएम दशपर्णी अर्क, ईएम अमिल अर्क, ईएम वेमिल अर्क, ईएम फळा अर्क, इ.निविष्ठा तयार करून वापर करणे याविषयी मार्गदर्शन केले.तसेच त्यांनी बायोडायनामिक कंपोस्ट, जैविक बीजप्रक्रिया, सेंद्रिय शेती प्रमाणिकरण पध्दत,समभाग निधीकरीता गटातील शेतकऱ्यांना कंपनी शेअर्स सभासद करून घेणे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. सेंद्रिय शेती काळाची गरज, सेंद्रिय निविष्ठा निर्मिती यामध्ये गांडूळ खत,व्हर्मी वॉश, हिरवळीच्या खतांचा वापर, जीवामृत, दशपर्णी अर्क तयार करणे याविषयी गटातील उपस्थित शेतक-यांना मार्गदर्शन केले.यावेळी गटातील अध्यक्ष ,उपाध्यक्ष सचीव व सदस्य उपस्थित होते. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी तालुका कृषि अधिकारी आर. जी. डमाळे, मंडळ कृषि अधिकारी ई. एम.अंभुरे , कृषी पर्यवेक्षक डी. बी. देवरे यांचे मार्गदर्शन लाभले.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित तज्ञ प्रशिक्षक व शेतकरी यांचे आभार मानुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## माणिकखांबच्या विठ्ठल रखुमाई चरणी ना. नरहरी झिरवळ नतमस्तक

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**लक्ष्मण घुगे राजापूर** – इगतपुरी तालुक्यातील माणिकखांब येथै महाराष्ट्र राज्याचे नवनिर्वाचित अन्न व औषध प्रशासन मंत्री नामदार नरहरी झिरवाळ यांनी



आमच्या अंखड हरिनाम सप्ताह या कार्यक्रमास सदिच्छा भेट दिली, व विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेतले, त्यांच्या समवेत इगतपूरी – त्र्यंबकेश्वर विधानसभेचे लोकप्रिय आमदार हिरामण दादा खोसकर, जि. प. सदस्य गोरख भाऊ बोडके हेही उपस्थित होते. यावेळी चव्हाण परिवार व माणिकखांब ग्रामस्थांच्या वतीने फुलांचा वर्षाव तसेच श्री. विठ्ठल रुक्मिणीची मुर्ती व रामकृष्ण हरि नावाची शाल देऊन सत्कार केला. अन्न औषध मंत्री पद मिळाल्यानंतर नामदार नरहरी झिरवाळ यांचे प्रथमच नाशिक जिल्हात आगमन झाले उत्तर महाराष्ट्राचे प्रवेशद्वार इगतपूरी तालुक्यामध्ये माणिकखांब येथे विठ्ठल रुक्खमिणी मंदिरा मध्ये चव्हाण (पाटील) परिवाराकडून रामकृष्ण हरि नावाची शाल व श्री विठ्ठल रुक्खमिणी ची मुर्ती फुलांचा वर्षाव करून जोशात स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे सर्व आयोजन राष्ट्रवादी युवक क्रॉंग्रेस ता. अध्यक्ष तथा मा. सरपंच माणिकखांब हरिश्चंद्र चव्हाण यांनी केले होते. यावेळी उपस्थीत ॲड. एन.पी. चव्हाण, ॲड जि. पी. चव्हाण, सभापती विष्णु चव्हाण उपसभापती छायाताई चव्हाण डॉ. धनंजय चव्हाण, डॉ. शुभदा चव्हाण हभप लक्ष्मण बुवा चव्हाण, मारुती पाटील चव्हाण आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# अन्न आणि आरोग्य (भाग १)



**डॉ. संदिप सबनिस**
**गस्ट्रो ओन्को सर्जन**
**अशोका मेडिकवर हॉस्पिटल, नाशिक**
**संपर्क : ७३८७३८७४६५**

**दै. आवाज वृत्तसेवा...**
**भाऊसाहेब हुजबंद, नाशिक**

आज आपण आपल्या आजच्या आधुनिक आणि धावत्या काळात, अतिशय वेगाने प्रचलित झालेल्या व त्याहूनही अधिक धोकादायक असणाऱ्या अन्न प्रकारा विषयी जाणून घेऊ, अगदी छोट्या टपरी पासून मोठमोठ्या सुपर मार्केट मधे उपलब्ध असलेल्या ह्या पदार्थाला म्हणतात, UPF.

अल्ट्रा-प्रोसेस्ड फूड (UPFs) हे औद्योगिक पद्धतीने तयार केलेले पदार्थ आहेत ज्यात अनेक घटक असतात, बहुतेक वेळा त्यात संरक्षक, रंगद्रव्ये, चव वाढवणारे आणि इमल्सिफायरसारखे पदार्थ असतात. हे अन्नप्रकार मोठ्या प्रमाणावर प्रक्रिया केलेले असतात, ज्यामुळे त्यांचे नैसर्गिक पोषण मूल्य कमी होते. सामान्य उदाहरणांमध्ये पॅकेज केलेले स्नॅक्स, साखरयुक्त धान्य, इन्स्टंट नूडल्स, शीतपेय, फास्ट फूड आणि रेडी-टू-ईट फ्रोझन जेवण यांचा समावेश होतो, म्हणजेच आपले दैनंदिन वापराचे चिप्स, नोड्डुलेस, चॉकलेट्स, ब्रेड, बिस्कीट, खारी, टोस्ट, फ्रोजन डेझर्ट, सगळी फास्ट फुड्स, इत्यादी.

अल्ट्रा-प्रोसेस्ड अन्नाचे वारंवार सेवन अनेक नकारात्मक आरोग्य परिणामांशी जोडलेले आहे. हे पदार्थ बहुतेक वेळा अस्वस्थ चरबी, अतिरिक्त साखर, मीठ आणि कृत्रिम घटकांनी समृद्ध असतात, तर त्यात फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांसारखे आवश्यक पोषक घटक कमी असतात. UPFs च्या नियमित सेवनामुळे लठ्ठपणा, टाइप २ मधुमेह, हृदयरोग, पचनाचे विकार आणि काही कॅन्सर देखील होऊ शकतात. जास्त साखर आणि मीठ यामुळे चयापचय समस्यांचा धोका वाढतो, तर संरक्षक पदार्थ आणि कृत्रिम घटक आंत्र आरोग्य बिघडवून दीर्घकालीन दाह आणि इतर आजारांना कारणीभूत ठरू शकतात.

आरोग्यपूर्ण जीवन जगण्यासाठी अल्ट्रा-प्रोसेस्ड अन्नाऐवजी नैसर्गिक आणि कमी प्रक्रिया केलेले पर्याय निवडणे आवश्यक आहे. भारतात पारंपारिक, पौष्टिक अन्नाचा समृद्ध वारसा आहे, जो केवळ पोषणमूल्याने समृद्ध नाही, तर स्थानिक अन्नसंस्कृतीशी जोडलेला आहे. काही आरोग्यपूर्ण पर्यायांमध्ये समाविष्ट आहे:

मिल्लेट: बाजरी, ज्वारी, रागी यामध्ये फायबर, प्रथिने आणि महत्त्वपूर्ण खनिजे असतात.

डाळी आणि कडधान्ये: राजमा, चणा, मूगडाळ ही प्रथिने आणि पोषक घटकांचे उत्तम स्रोत आहेत.

ताज्या भाज्या आणि फळे: स्थानिक हंगामी भाज्या जसे की पालक, भोपळा आणि पेरू अँटीऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वांनी समृद्ध आहेत.

घरी तयार केलेले स्नॅक्स: पॅकेज्ड स्नॅक्सच्या जागी भडंग, चिवडा आणि मखाना यासारख्या पर्यायांचा समावेश लाभदायक आहे.

पारंपारिक अंबिविलेले अन्न: इडली, डोसा आणि ताक यासारखे पदार्थ प्रोबायोटिक्सने समृद्ध आहेत, जे आंत्र आरोग्यासाठी उपयुक्त असतात.

या स्थानिक आणि पोषक तत्वांनी समृद्ध अन्नाचा आहारात समावेश केल्याने आरोग्य सुधारू शकते आणि दीर्घकालीन आरोग्य टिकवले जाऊ शकते.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ – ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# बिटको महाविद्यालयात 'भारतीय शिक्षण, संशोधन आणि ज्ञानाचे आदान-प्रदान' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिकरोड : नाशिकरोड महाविद्यालयाला ६० वर्ष पुर्ण होऊन परिसरात मोठा लौकिक प्राप्त केला आहे. जागतिक पातळीवर भारतीय शिक्षणपद्धती अभ्यासली गेली आहे. ज्ञानाची व्याप्ती सर्वसमावेशक आहे. ज्ञान हे अर्जनासाठी, अर्जन अर्पित करण्यासाठी असून मिळालेले ज्ञान माझ्यासाठी नाही तर कृतार्थ भावनेने अर्पित करा. शिक्षकांची भूमिका निर्भय, प्रखर, सर्वसमावेशक असावी. शिक्षण प्रकियेची ध्येय साध्य करण्यासाठी एकत्रितपणे येउन सांघिक भावनेने, एकदिलाने व योग्य व्यवस्थापन करून अंमलाबजावणी केली तरच ज्ञानदान कार्य सफल होईल. संशोधनाला सातत्य व मेहनतीची आवश्यकता आहे. माणसाच्या मनात झरा, झेप, झुंज हवी, असे ज्येष्ठ विचारवंत वक्ते प्रकाश पाठक यांनी केले. गोखले एज्युकेशन सोसायटीच्या नाशिकरोड येथील बिटको महाविद्यालयात 'महाराष्ट्र कौन्सिल ऑफ एज्युकेशन ऍडमिनिस्ट्रेशन अँड मॅनेजमेंट पुणे, गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक आणि डॉ. एमएसजी फाउंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय शिक्षण, संशोधन आणि ज्ञानाचे आदान-प्रदान या विषयावर दोन दिवसीय (दि. २७ व २८ डिसेंबर) राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विचारवंत प्रकाशजी पाठक, सन्माननीय पाहुण्या संस्थेच्या अध्यक्षा डॉ. सौ. एस. व्ही. संत तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्रेसिडेंट डॉ. आर. पी. देशपांडे,एमसीईएमचे सेक्रेटरी डॉ. के. आर. शिंपी, सल्लागार डॉ. पी. यु. रत्नपारखी, मुंबई येथील अथर्व इंजिनिअरिंग कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. एस. पी. कल्लूरकर, विभागीय सचिव डॉ. राम कुलकर्णी, प्राचार्य डॉ.व्ही.एन.



सूर्यवंशी, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मंजुषा कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. के. सी. टकले, डॉ. अनिलकुमार पठारे, डॉ आकाश ठाकूर, डॉ. प्रणव रत्नपारखी, प्रणाली पाथरे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग व दिग्दर्शक श्याम बेनेगल यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. एमसीईएमच्या अध्यक्षा डॉ. दीप्ती देशपांडे यांनी परिषदेला आपल्या शुभेच्छा कळविल्या. प्राचार्या डॉ. मंजुषा कुलकर्णी यांनी मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. एमसीईएमचे सचिव डॉ. के. आर. शिंपी यांनी परिषदेविषयी माहिती देताना आज होणारे हे एमसीईएमचे ३२ वे अधिवेशन होत असल्याची माहिती दिली. नाशिकरोड येथील बिटको महाविद्यालयाची हीरक महोत्सवी वाटचाल (१९६३-२०२४) वर आधारित शैक्षणिक चित्रफीत प्रदर्शनाचे प्रमुख मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

गोखले एज्युकेशन सोसायटीचे प्रेसिडेंट डॉ. आर. पी. देशपांडे यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना, निरपेक्ष भावनेने शिक्षकाने काम करावे. नाशिकरोड महाविद्यालय कम्युनिटी कॉलेज म्हणून ओळखले जाते. सातत्याने शिकत असावे. संशोधनाला महत्त्व द्यावे, आपल्यातील चांगल्या गुणांचा इतरांना सदुपयोग व्हावा त्याचा वर्तनात अंगीकार करा, सकारात्मकता आणून विद्यार्थ्यांमध्ये सर्वांगिण विकास घडवा. असे सांगितले.

दुपारच्या सत्रात दोन तांत्रिक सत्र संपन्न झाले. यात ' भारतीय संस्कृती आणि जगासोबत ज्ञानाचे आदान प्रदान' व ' दर्जेदार शाळा: समग्र विकासाची गुरुकिल्ली' या विषयावर चर्चासत्र संपन्न झाले. यात गोखले एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी संत, सनदी लेखापाल व प्रसिद्ध वक्ते प्रकाश पाठक, संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. पी. देशपांडे, मुंबई मालाड येथील अथर्व इंजिनिअरिंग कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. एस. पी. कल्लूरकर यांनी सहभाग घेतला. या सत्रांमध्ये बोरिवली महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. महेश औटी , बिटको हायस्कूलच्या सौ. मानसी सागर, सौ रोहिणी बटवाल, सौ. प्रतिमा वाघ यांनी पेपर प्रबंध सादर केला. या सत्रात विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. के. सी. टकले, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. अनिलकुमार पठारे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

# प्राण्यांवर साथीच्या रोगाने घातले थैमान

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मारुती जगधने, नांदगाव : नाशिक जिल्ह्यामध्ये गाई गुरे शेळ्या मेंढ्या व अन्य पाळीव प्राण्यांवरती साथीच्या रोगाने थैमान घातले असून पशुपालक त्रस्त झाले आहे काही केल्याने रोगावर नियंत्रण येत नसल्यामुळे जनावरांचे दगावन्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे पशुपालकांनी या संदर्भात व्हेटर्नरी म्बुलन्स बोलून काही उपचार करून घेतले मात्र त्यातही समाधान झालेले नाही. अजूनही जनावर मरण्याचे काम सुरूच आहे शेळ्यांचेड्ढ साथीच्या रोगा चे प्रमाणात अधिक वाढ झालेली आहे साथीच्या रोगांनी शेळ्या मरण पावत चालले आहे यावर तात्काळ आणि रामबाण उपाय यांची गरज असल्याची मागणी पशुपालकांनी केली आहे जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील वामन टिळेकर भगवान खैरनार व अन्य पशुपालकांचे जनावरे दगावली असून आर्थिकदृष्ट्या ही मंडळी नुकसान सहन करत आहे जनावरांवर तात्काळ उपायोजनाची गरज असल्याची उपाय आणि याकडे लक्ष देऊन उपायोजना करावी व जनावरांना लसचे उपलब्ध करून द्यावी.

शेळ्या, मेंढ्या, गाई, ढोरे, गुरे यांसारख्या प्राण्यांमध्ये साथीच्या रोगामुळे मृत्यूचे प्रमाण वाढत असल्यास शासन स्तरावर तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता असते. या संदर्भात पुढील उपाययोजना केल्या जाऊ शकतात:

रोग नियंत्रण व प्रतिबंधक उपाययोजना:

लसीकरण: साथीचे रोग टाळण्यासाठी प्राण्यांना आवश्यक लसी देणे.

तत्काळ उपचार: आजारी प्राण्यांसाठी वैद्यकीय पथक पाठवून तातडीने उपचार करणे.

रोगनिदान केंद्रे: गावागावात पशुवैद्यकीय केंद्रे उपलब्ध करून देणे.

पशुपालकांना जनजागृती:

प्रशिक्षण: पशुपालकांना रोगांची लक्षणे ओळखण्याचे व योग्य काळजी घेण्याचे प्रशिक्षण देणे.

आरोग्य शिबिरे: गावोगावी आरोग्य शिबिरे भरवून प्राण्यांची तपासणी करणे.

सफाई व स्वच्छता:

परिसराची स्वच्छता: प्राण्यांच्या गोठ्यांची स्वच्छता व रोगप्रसार टाळण्यासाठी निर्जंतुकीकरण करणे.

खाद्य व पाणी व्यवस्थापन:

प्राण्यांसाठी स्वच्छ व पौष्टिक खाद्य आणि पाण्याची व्यवस्था करणे.

. नुकसानीची भरपाई:

रोगामुळे मरण पावलेल्या प्राण्यांच्या मालकांना शासनाकडून आर्थिक मदत व विमा भरपाई देणे.

. शास्त्रीय संशोधन व उपाययोजना:

साथीच्या रोगांचा अभ्यास करून भविष्यातील धोके टाळण्यासाठी संशोधनावर भर देणे.

औषधांच्या उपलब्धतेसाठी स्थानिक पातळीवर उत्पादन वाढवणे.

हॉटलाइन सेवा:

पशुपालकांसाठी टोल-फ्री हेल्पलाइन क्रमांक सुरू करणे, जेणेकरून ते तातडीने मदत मागू शकतील.

शासनाने या उपाययोजना तत्काळ राबविल्यास प्राण्यांचे जीव वाचवणे व पशुपालकांचे नुकसान टाळणे शक्य होईल.

## अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांनी परदेश शिष्यवृत्तीसाठी ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

मुंबई : अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांसाठी परदेशात पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती निवडीसाठी सन २०२४-२५ करिता पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत असून विद्यार्थ्यांनी दि. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन कार्यालय अधीक्षक समाज कल्याण मुंबई शहर यांनी केले आहे. अल्पसंख्याक विभागामार्फत सन २०२४-२५ मध्ये राज्यातील अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरिता परदेशात पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी. अभ्यासक्रमांसाठी परदेश शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यासाठी अल्पसंख्याक विभागाने मंजुरी दिलेली आहे. याबाबत शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ताज्या घडामोडींमध्ये विस्तृत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

# सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक अशोक मोरे यांची निवड

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**नांदगाव/प्रतिनिधी-** धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठाण मराठवाडा, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने नांदगाव तालुक्यातील मोलडुंगरी येथील सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक अशोक मोरे यांची मार्गदर्शक नाशिक जिल्हाप्रमुखपदी नुकतीच निवड केल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील यांनी दिली. नांदगाव तालुक्यात अशोक मोरे हे सामाजिक



कार्यात नेहमीच अग्रेसर राहतात. आपल्या नोकरीतील कार्यकाल पुर्ण केल्यावर अनेक जण उर्वरीत कालावधी आपल्या स्वतःच्या सुखासाठी घालवतात. मात्र श्री मोरे यांनी आपले उर्वरीत जीवन समाजाकरीता वाहून घेतलेले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठाण मराठवाडा, महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने त्यांची ही नियुक्ती केली आहे.

## राष्ट्राच्या विकासात युवक हा आधारस्तंभ - प्रा.सुरेश नारायणे यांचे प्रतिपादन



**दै. आवाज वृत्तसेवा...**

**नांदगाव/प्रतिनिधी-** कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,नांदगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना +२ स्तराच्या श्रमसंस्कार शिबिरात आज 'आजचा युवक व नीतिमूल्ये' या विषयावर व्याख्यान प्रा.सुरेश नारायणे यांचे आयोजित करण्यात आले होते. त्यांनी आपल्या मनोगतातून राष्ट्राच्या विकासात विद्यार्थी हा आधारस्तंभ असल्याने त्यांनी आपल्या जीवनात उच्च नीतिमूल्यांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले.युवकांनी मोबाईलचा व तंत्रज्ञानाचा चांगल्या गोष्टींसाठी वापर करावा. व्यसनाधिनता टाळावी. पौष्टिक आहार घ्यावा. समाजात वावरतांना सामाजिक भान ठेवून नितीन मुद्द्यांची जोपासना करावी. विवेकशीलता जपावी. वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगावा. श्रमप्रतिष्ठेला महत्त्व द्यावे. युवकाच्या जीवनाशी संबंधित विविध विषयांवर त्यांनी व्याख्यानात सखोल मार्गदर्शन केले. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.एन. भवरे यांनी नारायणे सरांचे स्वागत केले. सदर प्रसंगी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. आर. एन.भवरे, विज्ञान विभाग प्रमुख प्रा.पी.एम. आहेर, प्रा.बी.वाय. आहेर, सहा. कार्यक्रमाधिकारी प्रा.एस.सी.पैठणकर, प्रा.श्रीमती एस.ए.लोखंडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन.एस.एस कार्यक्रमाधिकारी प्रा.बी. के.पवार यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.एस.जी.पवार यांनी केले. सदर व्याख्यानासाठी शिबिरार्थी विद्यार्थी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना केले मार्गदर्शन व शालेय साहित्यांचे वाटप

## किसनराव पाटील भोई यांच्या पुण्यस्मरणार्थ प्रेरणादायी उपक्रम

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**नाशिक/प्रतिनिधी-:** नाशिक शहरातील समाजसेवी व्यक्तिमत्त्व, अनेकांचे मार्गदर्शक,भगवान त्र्यंबकेश्वराचे कट्टर उपासक मितभाषी,परोपकारी आदर्श व्यक्तिमत्व असलेल्या स्वर्गीय किसनराव दादा भोई (पाटील) यांच्या द्वितिय पुण्यस्मरणार्थ हिरावाडी परिसरातील मनपा शाळा क्रमांक ८ येथील विद्यार्थ्यांना लक्ष्मीबाई पाटील-भोई यांच्या हस्ते शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले.



विद्यार्थ्यांना अभ्यासात अधिक रुची निर्माण व्हावी.त्यांना प्रेरणा मिळावी यासाठी हा प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी लक्ष्मीबाई पाटील यांनी उपस्थितीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.आजचे बालक उद्याचे राष्ट्रचालक आहे.विद्यार्थ्यांनी आपल्या आई वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून प्रचंड मेहनतीने अभ्यास करावा.आई वडील, शिक्षक यांच्या आज्ञेचे पालन करावे आणि एक सुसंस्कारित व आदर्श व्यक्तिमत्व व्हावे. स्वर्गीय किसनराव पाटील-भोई यांना विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी मोठी तळमळ होती. आजचे विद्यार्थी म्हणजे उद्याचे भविष्य असल्याचे ते नेहमी म्हणत असल्याचेही लक्ष्मीबाई पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले.

यावेळी हिरावाडी येथील मनपा शाळा क्रमांक ८ च्या मुख्याध्यापिका वंदनाताई पवार, शिक्षिका योगिता पवार, मनिषा निकम, कविता पगार,अनिता लहारे,सीमा पवार यांसह हिरावाडी येथील श्री तुळजा भवानी संस्थानच्या विश्वस्त लक्ष्मीबाई पाटील भोई, त्रिवेणीताई पाटील, कावेरीताई भोई, वैशालीताई भोई, नयनाताई भोई, नाशिक एक्सप्रेस वृत्तपत्राचे कार्यकारी संपादक सर्वज्ञ पाटील यांसह शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जैन कलार प्रीमीयर लीग टुर्नामेंट-२०२५ करीता संघ घोषित



**दै. आवाज वृत्तसेवा...**

रमेश लांजेवार, नागपूर - समाजातील संपूर्ण युवा वर्ग एकत्र यावा व नव्याने उर्जा निर्माण व्हावी या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी समाजातर्फे प्रीमियर लीग टुर्नामेंटचे आयोजन करण्यात येत आहे.दिनांक ७ जानेवारी ते १२ जानेवारी २०२५ पर्यंत चालणाऱ्या प्रीमियर लीग सिझन - ७ टुर्नामेंट करीता संघ घोषित करण्याकरिता संपूर्ण खेळाडूंची सभा दिनांक २२ डिसेंबर २०२४ ला जैन कलार समाज सांस्कृतिक भवन, नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती.यामध्ये वेगवेगळ्या संघाने आपली नोंद करून हजेरी लावली. अशाप्रकारे ७ जानेवारी पासून सुरू होत असलेल्या विदर्भातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील १५ संघानी आपली नोंद करून खेळाडूंमध्ये नवीन ऊर्जा निर्माण करून आपआपल्या संघाची घोषणा केली.

या टुर्नामेंटच्या संपूर्ण मॅचेस ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय, क्रीडा चौक, हनुमान नगर, नागपूर येथे आयोजित केल्या असून सकाळी ९.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत खेळल्या जाईल.या सभेला संघ प्रमुख, आयोजक, खेळाडूंसह अनेक मान्यवर व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.या सभेचे सुत्र संचालन राकेश मासुरकर यांनी केले या सभेला प्रामुख्याने अनिलजी तिडके, सुधीरजी फटिंग, काशिनाथ ठवरे, रमेश लांजेवार, प्रमोद पालांदुरकर, राजेश पलांदुरकर, प्रकार भांडारकर,अक्षय तिडके, विरेश दुरूगकर, सचिन दहिकर, निखिल हरडे, पंकज दहिकर, राहुल शेंडे, सुरज बन्सोड, बंडुभाऊ शनिवारे,अक्षय खाणोरकर, महेश तिडके, मयुरेश दडवे, पंकज खाणोरकर, स्वप्निल रहाटे, राकेश शिरपुरकर,अनुप हरडे, कुणाल घोसेकर,पारस मोटघरे, स्वप्निल रनदिवे, अमोल तिडके, अक्षय खानोरकर सौरभ समर्थ, निखील हरडे, पंकज खानोरकर, राकेश शिरपुरकर, ऋषब डवले, अनुप हरडे, बंडुजी शनिवारे, इत्यादीसह अनेक मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

# गुरुकुल फाउंडेशन व पीसीसीडीएच्या वतीने येत्या नविन शैक्षणिक धोरणावर व्याख्यान

**दै. आवाज वृत्तसेवा...**

शरद लोहकरे, लासलगाव - नाशिक जिल्हा कॉचिंग क्लासेस संचालक संघटना पीसीसीडीए व गुरुकुल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, रविवार दि. २९ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता, मुंबई नाका येथील कोर्टयार्ड या पंचतारांकित हॉटेल येथे, येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरु होत असलेल्या नविन शैक्षणिक धोरणाबाबत शिक्षकांना माहिती व्हावी या उददेशाने, व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. पुणे येचील महाराष्ट्र स्टेट कौन्सिल ऑफ एज्युकेशन रिसर्च अँड ट्रेनिंग या सरकारी संस्थेचे आय टी विभागाचे प्रमुख डॉ. योगेश सोनवणे हे प्रमुख व्याख्याते असून, त्यांच्या हस्ते, महाराष्ट्रातील १२० गुणवंत यशस्वी क्लासेस संचालक शिक्षकांचा, उत्कृष्ट गुरुवर्य हा पुरस्कार देउन सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष जयंत मुळे आणि गुरुकुल फाउंडेशनचे संचालक प्रा. युवराज कराड यांनी दिली. यावेळी गुरुकुल फाउंडेशनचे संचालक प्रा युवराज कराड, प्रफुल्ल देशमुख,अल्पेश साळी,नितीन घेगडमल,सुचंद्र माटे,विकास पाटील आदी उपस्थित राहणार असून याप्रसंगी मयुर जाधव, तेजस बुचके, संतोष बच्छाव, राहुल नागरे, घनशाम अहिरे, किशोर सपकाळे, योगेश बोरसे, विद्या राकडे, गोरक्ष लांडे, सुनीता लांडे, दुर्गेश तिवारी, गणेश कोतकर, दिनेश राठोड, ज्योती शिवले, दिपक शिवले, लिना ठाकरे, गायत्री बागले, जयवंत जाधव, अण्णासाहेब नरुटे, रविंद्र पाटील, गणेश पवार, माधवी चिंतामणी, यशवंत भामरे, रोहीणी भामरे, प्रमोद गुप्ता, अनिल दवणे, धनंजय शिंदे, विक्रमराजे गोसावी, संतोष बत्तीसे, स्नेहल बोडके, सोनाली आहेर, रविंद्र कांकरिया, विवेक भोर, सचिन अपसुंदे, स्वप्नाली अपसुंदे, मुकुंद रनाळकर, हर्षदा हेनरी, सरदार हेनारी, कैलास गीते, गायत्री चौधरी, विक्रांत राजगुरु, दिपाली मोगल, सुनील मोरे, धनंजय भामरे, निशा ठाकरे, प्रतिभा गांगुर्डे, मच्छिंद्र आंडी, सुनिता जोशी, अनंत चांदवडकर, अभिमान पाटील, सचिन डोली, वाल्मीक सानप, उमादेवी विश्वकर्मा, भारती जाधव, हणमंतगुडे, मयुर अहिरे, प्रकाश खैरनार, सागर परेवाल, दिलीप पवार, स्वाती जगताप,



कांता घडगे, किती माळी, शाहीन शेख, सुवर्णा रोकडे, मेघा हिरवे, वैशाली भोर, किरण सुर्यवंशी, मनीष सुरसे, अमीन शाह, निलेश दूसे, पवन जोशी, प्रितेश जाधव, मनिष जोशी, कैलास जेजुरे, मयुर ठाकरे, गौरी मंद, निलेश देवरे, प्रार्थना जेजुरे, योगिता भगत, सुनिता पवार, वैशाली उद्योग, सुनील सोळंकी, महेंद्र मंडलिक, अगस्त्य मुनिम, कैलास खताळे, संजय अभंग, दीपाली पिंगळे, अरुण कुशारे, महेश थोरात, संजय कुलकर्णी, राज बंदरे, सुषमा बंदरे, रविकांत यादव, स्वप्निल कदम, विशाल पाटील, प्रदीप घोटेकर, अभिलाष पंडित, रमेश ठाकरे, प्रज्ञा पगार, मोजेश्वर मोजाड, रुपाली अमृतकर, स्नेहल थोरात, सारिका सावंत, रुद्राणी रफाड, रोशन पाटोळे, सविता खताळे विजय खाडे, मनिषा राउत, आर एन अहिरे, गजानन पाडे, वंदना खाडे, किरण पगार, प्रतिभा देवरे, सारिका जोशी, नरेंद्र निकुंभ,कैलास हारदेचो आदी क्लासेस संचालक शिक्षकांचा सन्मान करण्यात येईल.

# निफाड तालुका माध्यमिक शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमनपदी खा.भास्करराव भगरे बिनविरोध



**दै. आवाज वृत्तसेवा...**

शरद लोहकरे, लासलगाव - निफाड तालुक्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अर्थवाहिनी समजल्या जाणाऱ्या निफाड तालुका माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदाची निवड प्रक्रिया सहकार अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी शैलेश मुरडकर यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या सभागृहात पार पाडण्यात आली, त्यांना सहायक म्हणून रतन दिवटे यांनी कामकाज बघितले,यावेळी चेअरमनपदासाठी खासदार भास्करराव भगरे यांचा एकमेव अर्ज मुदतीत दाखल झाला त्यांना सूचक नगरसेवक साहेबराव बर्डे तर अनुमोदन किरण जाधव होते,व्हा चेअरमनपदी बाळकृष्ण वाजे यांचा एकमेव अर्ज आला त्यांना सूचक बी. आर. सोनवणे होते तर अनुमोदक भगीरथ सोनवणे होते,निर्धारित वेळेत दोघांचेही एकमेव नामनिर्देशन पत्र दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी शैलेश मुरडकर यांनी सदर निवडी बिनविरोध झाल्याचे जाहीर केले, यानंतर झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत कार्यवाह पदासाठी राहुल दवते यांच्या अर्जावर सूचक बाळासाहेब गुंजाळ तर अनुमोदक हेमलता जाधव यांनी स्वाक्षरी केली निर्धारित वेळेत एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांचीही निवड बिनविरोध झाल्याचे घोषित करण्यात आले,यावेळी नवनिर्वाचित सर्व पदाधिकाऱ्यांनी आनंदोत्सव साजरा केला,तसेच त्यानंतर झालेल्या सभेमध्ये गोदावरी माध्यमिक विद्यालय, शिंगवे येथील बाळकृष्ण शिंदे तसेच स्व. माधवराव बोरस्ते विद्यालय, साकोरे मिग येथील महेंद्रसिंग राजपूत यांची स्वीकृत संचालक म्हणून निवड करण्यात आली आहे. याप्रसंगी सहायक निबंधक कांतीलाल गायकवाड, कैलास भारती, साहेबराव बर्डे,बाळासाहेब सोनवणे,रामराव बनकर, राहुल दवते,बाबा गुंजाळ,गणेश महाले,किरण जाधव,बाळकृष्ण वाजे,भगीरथ सोनवणे,सोनाली होळकर,हेमलता जाधव आदी संचालक तसेच सुनील होळकर, व्यवस्थापक रतन दिवटे व ज्ञानेश्वर धाटबळे आदी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेत आदर्श इंग्लिश मिडीयम स्कूलचे यश मानसी माळी नहीरे गोल्डन बॉलने सन्मानित

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक (प्रतिनिधी) - आदर्श रयतेचा आवाज चमू व इनएब्लिंग लीडरशीप व आर्मस्ट्रॉंग यांच्या संयुक्त विद्येमाने सटाणा येथील डिव्हाइन इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये झालेल्या राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेत ज्यूनियर गटात मविप्र सटाणा आदर्श इंग्लिश मिडीयम स्कूलच्या आदर्श सुपरस्टार ए या संघाने अंतिम सामना जिंकून राष्ट्रीय स्तरावर बेंगलोर येथे होणाऱ्या स्पर्धेत प्रवेश निश्चित केला. या वेळी आदर्श रॉकस्टार बी हा संघ उपविजेता ठरला. अंतिम सामना अतिशय चुरशीचा झाल्याने शेवटच्या क्षणात भावेश गांगुर्डे व अर्णव पगार यांनी निर्णायक गोल करून आपल्या संघाला ३ - १ असा पक्का विजय



मिळवून दिला. आयोजकांनी विजेत्या संघाला ट्रॉफी देऊन सर्वांचे अभिनंदन केले. उत्कृष्ठ खेळाडू कु. मानसी किशोर माळी नहीरे दाभाडी ह. मु. सटाणा हिला गोल्डन बॉल सन्मानपत्र मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. इतरही विजेत्या खेळाडूंना गोल्डन ग्लोज , बुट, बॉल , देऊन गौरविण्यात आले. प्रशिक्षक म्हणून दिपक प्रजापती, प्रसाद सोनवणे, अनिकेत येवला, विशाल सनेर, केतन सुर्यवंशी, पराग सोनवणे, शाळेचे क्रिडा शिक्षक विनय सोनवणे व अविनाश वाघ यांचे सर्वांना उत्तम मार्गदर्शन लाभले. या प्रसंगी मविप्र संस्थेचे सरचिटणीस ॲड.श्री नितिन ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी,डायरेक्टर डॉ. प्रसाद सोनवणे, महिला संचालिका शालन सोनवणे, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष सुनिल सोनवणे व सर्व सदस्य मुख्याध्यापक व शिक्षक व शिक्षकेतर वर्गाने विजेत्या व उपविजेतेत्या संघाचे अभिनंदन केले. कु. मानसी माळी नहीरे हि गावगाडा कर लेखक संपादक साहेबराव तात्या नंदन यांची नात आहे. तीचे सर्व स्तरातून विशेष अभिनंदन होत असून बेंगलोर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धे साठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# २ लाखांची लाच स्वीकारतांना...

(पान १ वरून) लाख रुपयांची लाच देण्याचे ठरले. दहा लाख रुपये लाचेची मागणी केली होती तडजड होऊन पाच लाख रुपये देण्याचे ठरले होते. तक्रारदार यांनी मात्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या धुळे कार्यालायात समक्ष भेटू तक्रार दिली होती. त्यानंतर धुळे येथील लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने २६डिसेंबर२०२४ गुरुवार रोजी सापळा रचून दुपारी १२ वाजून ४७ मिनिटांनी खाजगी साथीदारा मार्फत तक्रारदाराच्या घरीच दोन लाखाची लाच घेताना सरपंच व लिपिक आणि खाजगी साथीदार यांना रंगेहाथ पकडले. याप्रकरणी मेहुणबारे पोलिस स्टेशनला सरपंच राजेंद्र मोरे लिपिक शांताराम बोरसे व खाजगी साथीदार सोनू ठेंगे यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८चे कलम ७,७ अ-ब-१२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. शेतजमिनी बाबत बहाळ रथाचे ता.चाळीसगाव ग्रामपंचायत कडून कुठल्याही प्रकारचा कोर्ट कचेरी संदर्भातील त्रास होऊ देणार नाही ,या मोबदल्यात २९नोव्हेंबर रोजी १०लाख रुपयांची मागणी केली असता त्यापैकी५लाख रुपये देण्याचे ठरले होते. या प्रकरणी तक्रारदार यांच्या तकरी नुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धुळे यांनी २९ नोव्हेंबर २०२४ रोजी पंचां समोर समक्ष पडताळणी केली. २६ डिसेंबर२०२४ रोजी पाच लाख रुपयां पैकी दोन लाख देण्याचे ठरले होते. हे दोन लाख रुपये खाजगी साथीदार यांच्या मार्फत तक्रारदार यांच्या घरी स्विकारतांना त्या खाजगी साथीदारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या धुळे पथकाने दिनांक २६ डिसेंबर गुरुवारी रोजी दुपार१२ वाजून ४७ मिनिटांनी बहाळ रथाचे ता. चाळीसगाव येथील ग्रामपंचायत सरपंच व लिपिक आणि खाजगी पंटर (साथीदार )यांना रंगेहाथ पकडले. या घटनेने चाळीसगांव तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी बहाळ ग्रामपंचायतचे सरपंच राजेंद्र महादू मोरे(वय ५० )यांच्या सह ग्रामपंचायत लिपिक शांताराम तुकाराम बोरसे (वय वर्षे ५०) व खाजगी सुरेश सोनू ठेंगे (वय वर्षे ४०)अशा तिघांच्या विरोधात गुन्हात दाखल करण्यात आला असून तिघांना अटक करण्यात आली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या तपासणी अधिकारीवर्गाने पोलीस निरीक्षक पंकज शिंदे सहकाऱ्यांनी जिल्हा सत्र न्यायालय जळगाव यांच्यापुढे हजर केले असता. यावेळी एसीबीच्या वतीने तपासाच्या कामी लाचेच्या गुन्ह्यात ग्रामविकास अधिकारी व ग्राम पंचायतीचे अन्य पदाधिकारी अडकले आहेत का ? कोणी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली आहे, किंवा स्वीकारली आहे का ?हे तपासण्यासाठी आरोपीला तीन दिवसांची पोलिस कोठडी मिळावी , अशी मागणी सरकारी वकील सुरेंद्र काबरा यांनी युक्तिवाद करून केली होती .मात्र जळगांव जिल्हा सत्र न्यायाधीश एन. एस. राजूरकर यांनी आरोपी सरपंच राजेंद्र मोरे व लिपिक शांताराम बोरसे यांना एक दिवसाची एसीबी पोलिस कोठडी तर खाजगी साथीदार सोनू ठेंगे यास न्यायालयीन कोठडी सुनावली. याप्रकरणी नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलिस अधिक्षक शर्मिष्ठा घागरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक सचिन साळुंखे, पोलिस निरीक्षक पंकज शिंदे, रुपाली खांडवी, पथकातील राजन कदम, मुकेश अहिरे ,संतोष पावरा, प्रविण मोरे ,रामदास बारेला, सुधीर मोरे, प्रविण पाटील, जगदीश बडगुजर यांनी कारवाई केली.

